May 10, 2025

**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza,
Plot No. C/1, G Block,
Bandra - Kurla Complex, Bandra (East),
Mumbai - 400 051.

**BSE Limited**
Corporate Relations Department,
1st Floor, New Trading Ring,
P. J. Towers, Dalal Street,
Mumbai - 400 001.

**Symbol: LTF**

**Security Code No.: 533519**

**Kind Attn: Head – Listing Department / Dept of Corporate Communications**

**Sub: Newspaper advertisement – Seventeenth Annual General Meeting of the Company**

Dear Sir/Madam,

Pursuant to the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed copies of newspaper advertisement published today i.e. May 10, 2025, in compliance with circulars issued by the Ministry of Corporate Affairs, in Financial Express (English) and Loksatta (Marathi) in compliance with the provisions of the Companies Act, 2013 in relation to the Seventeenth Annual General Meeting of the Company.

The copies of newspaper advertisement are also being made available on website of the Company i.e. https://www.ltfinance.com/investors .

We request you to take the aforesaid on records.

Thanking you,

Yours faithfully,

For **L&T Finance Limited**
(formerly known as L&T Finance Holdings Limited)

APURVA NEERAJ RATHOD
Digitally signed by APURVA NEERAJ RATHOD
Date: 2025.05.10 15:35:44 +05'30'

**Apurva Rathod**
**Company Secretary and Compliance Officer**

Encl: as above

# कर्नाक पूल रखडवणाऱ्या कंत्राटदारास दंड

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील कर्नाक पुलाचे काम अंतिम टप्प्यात आलेले असतानाच पोहोच रस्त्यांचे काम रखडवल्यामुळे मुंबई महापालिका प्रशासनाने कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई केली आहे. या कंत्राटदाला प्रतिदिन २० लाख रुपये याप्रमाणे आतापर्यंत एक कोटी रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. हा पूल १० जूनपर्यंत सुरू करण्याचे पालिका प्रशासनाचे उद्दिष्ट होते.

मुंबई महापालिकेने कर्नाक पुलाचे काम पूर्ण करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. या पुलाचे रेल्वेच्या हद्दीतील काम पूर्ण झाले आहे. मात्र पुलाच्या पोहोच रस्त्याचे काम रखडले आहे. पुलाच्या पोहोच रस्त्यासाठी लागणारे गर्डर म्हणजेच तुळई अद्याप आले नसल्यामुळे पुढचे काम रखडले आहे. त्यामुळे प्रशासनाने कंत्राटदाराला काम लवकर करण्याबाबत बजावले होते. मात्र पुलासाठीचे गर्डर ३० एप्रिलपर्यंत न आल्यामुळे दंडात्मक कारवाई केल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

आतापर्यंत कंत्राटदाराला एक कोटी रुपये दंड केला आहे. पुलाचे गर्डर एक - दोन दिवसात आले तरच १० जून रोजी पूल सुरू करता येणार आहे. अन्यथा पूल रखडण्याची शक्यता आहे. कर्नाक उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. पूर्व दिशेला ८ खांब पूर्ण झाले असून ४० पैकी ५ लोखंडी तुळ्या प्रकल्पस्थळी आल्या आहेत. दोन्ही बाजूंचे पोहोच रस्ते ५ जून २०२५ पर्यंत तयार करावे आणि १० जून २०२५ पर्यंत पुलाच्या मुख्य वाहतूक मार्गाचे काम पूर्ण करावे, असे निर्देश अभिजीत बांगर यांनी दिले.

# आरे-वरळी नाका प्रवास अर्ध्या तासात

## बीकेसी- आचार्य अत्रे चौक मेट्रो टप्पा २ अ आजपासून वाहतूक सेवेत

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** 'कुलाबा - वांद्रे - सीप्झ - आरे भुयारी मेट्रो ३' मार्गिकेतील बीकेसी - आचार्य अत्रे चौक, वरळी नाका टप्पा २ अचे लोकार्पण शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. बीकेसी - आचार्य अत्रे चौक मार्गिका शनिवारी सकाळी ६.३० वाजता वाहतूक सेवेत दाखल होत आहे. त्यामुळे आता मुंबईकरांना आरे - वरळी नाका असा थेट अतिजलद आणि गारेगार प्रवास करता येणार आहे.

आरे - वरळी नाका दरम्यान रस्ते मार्गे प्रवास करण्यासाठी किमान सव्वा ते दीड तास अवधी लागतो. गर्दीच्या वेळी हा अवधी आणखी वाढतो. पण आता मात्र भुयारी मेट्रोच्या माध्यमातून हा प्रवास केवळ ३६ मिनिटांत पार करता येणार आहे. मात्र आरे - आचार्य अत्रे चौक दरम्यान अतिजलद प्रवासासाठी मुंबईकरांना ६० रुपये मोजावे लागतील.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) ३३.५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिकेचे काम हाती घेतले आहे. या मार्गिकेतील आरे - बीकेसी दरम्यानची १२.६९ किमी लांबीची मार्गिकेचे ऑक्टोबर २०२४ पासून संचलन सुरू आहे. आता बीकेसी - आचार्य अत्रे चौक टप्पा २ अचे काम पूर्ण करून, या टप्प्यासाठी मेट्रो आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा यांच्याकडून सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे. आता या टप्प्याचे लोकार्पणही करण्यात आले आहे. ९.७७ किमी लांबीचा, सहा मेट्रो स्थानकांचा समावेश असलेला हा टप्पा शनिवारपासून वाहतूक सेवेत दाखल होत आहे. शनिवारी सकाळी ६.३० वाजता आरे - आचार्य अत्रे चौक मार्गिकेचे संचलन सुरू होणार आहे.

त्यानुसार आरे मेट्रो स्थानकावरून आचार्य अत्रे चौकसाठी पहिली मेट्रो गाडी, तसेच आचार्य अत्रे चौक मार्गावरून आरेसाठी पहिली मेट्रो गाडी सकाळी ६.३० वाजता सुटेल. आता मेट्रो ३ मार्गिकेतील अंदाजे २३ किमीची मार्गिका वाहतूक सेवेत दाखल असणार आहे.



### २४४ फेऱ्या

आरे-बीकेसी मार्गिकेदरम्यान मेट्रो गाड्यांच्या दररोज २६० फेऱ्या होत होत्या. आता मात्र आरे - आचार्य अत्रे चौक स्थानकादरम्यान मेट्रोच्या फेऱ्या होणार असून या फेऱ्यांची एकूण संख्या २४४ असेल, अशी माहिती एमएमआरसीकडून देण्यात आली. आरे - बीकेसीदरम्यान १० मेट्रो गाड्या धावत होत्या. पण आता मात्र आरे - आचार्य अत्रे चौकदरम्यान एकूण १८ मेट्रो गाड्या धावणार आहेत. तर या गाड्यांची वारंवारता ६ मिनिटे २० सेंकद अशी असणार आहे. एकूणच आता आरे - आचार्य अत्रे चौक अशी भुयारी मेट्रो कार्यान्वित होत आहे.

# गोखले पुलाचे उद्या लोकार्पण

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** अंधेरीमधील बहुचर्चित गोपाळकृष्ण गोखले पुलाचे १०० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून, रविवारी संध्याकाळी या पुलाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशीष शेलार यांच्या हस्ते या पुलाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. त्यानंतर गोखले पूल पूर्ण क्षमतेने वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. तब्बल अडीच वर्षांनी गोखले पूल पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे.

अंधेरी पूर्व-पश्चिमेला जोडणारा महत्त्वाचा दुवा असलेल्या गोपाळकृष्ण गोखले पुलाची दुसरी बाजू लवकरच सुरू होणार आहे. गोखले पूल धोकादायक ठरल्यामुळे नोव्हेंबर २०२२ मध्ये बंद करण्यात आला होता. त्यानंतर या पुलाच्या बांधकामावरून बराच गदारोळ झाला. पुलाची एक बाजू सुरू करण्याची मुदत वारंवार हुकली. गोखले पूल आणि बर्फीवाला पूल यांच्या जोडणीत मोठे अंतर पडले होते. त्यामुळे या पुलाच्या कामाचे हसे झाले होते. अखेर गोखले पूल आणि बर्फीवाला पुलाची जोडणी करून पुलाची एक बाजू फेब्रुवारी २०२४ मध्ये वाहतुकीसाठी खुली करण्यात आली होती. त्यानंतर पुलाच्या दुसऱ्या बाजूचे काम हाती घेण्यात आले होते. हे काम आता १०० टक्के पूर्ण झाले असून, मे महिन्याच्या पहिल्या



### काम वेगाने

जुहू-विलेपार्ले विकास योजना (जेव्हीपीडी) अंतर्गत उड्डाणपुलाच्या पूर्व दिशेकडील पोहोच रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. बर्फीवाला पूल जेथे उतरतो त्या ठिकाणचा बाजूचा रस्ता (स्लीप रोड) अरुंद आहे. त्यामुळे पोहोच रस्ता पूर्ववत करून वाहतुकीसाठी खुला करावा, जेणेकरुन नव्याने कार्यान्वित होणाऱ्या बर्फीवाला पुलाच्या दक्षिण भागातील उतारावरील वाहतूक सुरळीत होईल. वाहनांची वाहतूक योग्य प्रकारे व्हावी, असे निर्देश नुकतेच पालिका अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी यंत्रणेला दिले आहेत.



ऐरोली -काटई नाका उन्नत मार्गिकेचे गर्डर तिरपे झाल्याने ट्रान्स हार्बर मार्गाची रेल्वे वाहतूक शुक्रवारी ठप्प झाली होती. त्यामुळे ठाण्याहून नवी मुंबईत जाणाऱ्या नोकरदारांचे हाल झाले. (छायाचित्र- दीपक जोशी)

# ट्रान्स हार्बर साडेचार तास विस्कळीत

## काटई उन्नत मार्गावरील तुळई झुकल्याचा परिणाम

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** ऐरोली-काटई उन्नत मार्गावरील लोखंडी तुळई (गर्डर) झुकल्याने मध्य रेल्वेच्या ट्रान्स हार्बर मार्गावरील सेवा शुक्रवारी साडेचार तास ठप्प झाली. त्यामुळे नवी मुंबईत कामासाठी जाणाऱ्या नोकरदारांचे आणि प्रवाशांचे मोठे हाल झाले. काही प्रवाशांनी रेल्वे रूळावरून पायी जात निश्चित स्थळ गाठले.

ऐरोली- काटई नाका उन्नत मार्ग प्रकल्पाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) सुरू आहे. ही मार्गिका ऐरोली स्थानकाजवळील रेल्वे मार्गिकेवरून जाते. याठिकाणी नऊ गर्डर बसविण्यात आले आहेत. दहावा गर्डर बसविण्यासाठी मध्यरात्री १ ते पहाटे ४ यावेळेत एमएमआरडीएने ब्लॉक घेतला होता. हा गर्डर काहीसा तिरका बसला होता. गर्डर बसविल्यानंतर तो तिरका बसल्याचे समोर आल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मध्य रेल्वेने ट्रान्स हार्बर मार्गिका बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शुक्रवारी सकाळी ७.१० ट्रान्स हार्बर मार्गिका बंद करण्यात आली. यामुळे सकाळी स्थानकांवर आलेल्या प्रवाशांची गर्दी वाढली. रेल्वे वाहतूक ठप्प होण्याचे कारण प्रवाशांना कळत नव्हते. त्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळाचे वातावरण होते. गर्डरचे काम पूर्ण केल्यानंतर साडे चार तासानंतर म्हणजेच ११.३० वाजता येथील रेल्वे सेवा सुरळीत झाली. रेल्वे वाहतूक ठप्प होण्याचे कारण प्रवाशांना न कळल्याने गोंधळाचे वातावरण होते.

एमएमआरडीएकडून सुरू असलेल्या कामादरम्यान गर्डर तिरके बसले होते. त्यामुळे रेल्वे सेवा ठप्प होती. सकाळी ११.३० नंतर ही सेवा सुरळीत झाली. - **पी.डी. पाटील**, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे.

# पश्चिम रेल्वेवर शनिवारी, मध्यवर रविवारी ब्लॉक

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी रविवार मेगाब्लॉक, तर पश्चिम रेल्वेवर शनिवारी रात्रकालीन ब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेवर रविवारी दिवसकालीन ब्लॉक नसेल.

**मध्य रेल्वे**

**मुख्य मार्ग**

**कुठे :** माटुंगा - मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्गावर

**कधी :** रविवारी सकाळी ११.०५ ते दुपारी ३.४५ दरम्यान

**कुठे :** कुर्ला - वाशीदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर

**कधी :** रविवारी सकाळी १०.४० ते दुपारी ४.४० दरम्यान

परिणाम : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - वाशी / बेलापूर / पनवेल अप आणि डाऊन लोकल सेवा रद्द करण्यात येणार आहे.

**पश्चिम रेल्वे**

**कुठे :** माहीम - सांताक्रूझ दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर

**कधी :** शनिवारी मध्यरात्री १ ते पहाटे ४.३० दरम्यान

# सावरकर सदन 'जैसे थे' राहू द्या!

## उच्च न्यायालयाचे निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे ऐतिहासिक निवासस्थान असलेले दादर येथील सावरकर सदन सध्या आहे त्या स्थितीत ठेवण्याचे आदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिले. त्याचवेळी सावरकर सदनला वारसा स्थळाचा दर्जा देण्याच्या महापालिकेने केलेल्या शिफारशीवर कधीपर्यंत अंतिम निर्णय घेणार, अशी विचारणाही न्यायालयाने सरकारला केली. तसेच त्यावर चार आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

न्यायमूर्ती अतुल चांदूरकर आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठापुढे शुक्रवारी याप्रकरणी सुनावणी झाली. त्यावेळी महापालिकेने जानेवारी २०१२ मध्ये वारसा स्थळ आणि राष्ट्रीय स्मारकांच्या यादीत सावरकर सदनच्या नावाचा समावेश केला होता आणि त्याबाबतच्या अंतिम शिफारशीचा प्रस्ताव सरकारकडे सादर केला होता. तथापि इमारतीचा पुनर्विकासाचा घाट घातला जात असून वारसा स्थळाचा दर्जा मिळण्यापूर्वी इमारत पाडली जाईल, अशी भीती याचिकाकर्ते आणि अभिनव भारत काँग्रेस या संघटनेचे अध्यक्ष पंकज फडणीस यांनी व्यक्त केली. तसेच, महापालिकेच्या शिफारशीनुसार सावरकर सदनला वारसा स्थळाचा दर्जा देण्याबाबत सरकारला अधिसूचना काढण्याचे आदेश देण्याची मागणी केली. न्यायालयाने याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर सरकारला १३ जूनपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. तत्पूर्वी, या ऐतिहासिक इमारतीचा पुनर्विकास केला जाणार असून त्यासाठी ती जमीनदोस्त केली जाण्याची भीती याचिकाकर्त्यांनी अंतरिम दिलासा मागताना केली.

### संवर्धनाचा प्रस्ताव २०१२ पासून सरकारकडे प्रलंबित



इमारतीला ऐतिहासिक महत्त्व असून त्यामुळे इमारतीला वारसास्थळाचा दर्जा आणि राष्ट्रीय स्मारक म्हणून मान्यता मिळावी, अशी मागणीदेखील याचिकेत करण्यात आली आहे. इमारतीचे जतन करण्यासाठी केलेला हा पहिला कायदेशीर प्रयत्न नाही. यापूर्वी २००८ मध्येदेखील अशीच याचिका उच्च न्यायालयात करण्यात होती. त्यानंतर मुंबई वारसा संवर्धन समितीने जानेवारी २००९ मध्ये सावरकर सदनला वारसा वास्तूचा दर्जा देण्याची शिफारस केली होती. तथापि, हा प्रस्ताव २०१२ पासून राज्य नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शिफारशीकडे राज्य सरकारने तत्काळ लक्ष द्यावे आणि ऐतिहासिक इमारत पाडण्यापासून वाचवावे, अशी मागणी याचिकेत केली आहे.

# खिचडी वितरण गैरव्यवहारप्रकरणी आरोपपत्र दाखल

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई:** करोना काळात महापालिकेकडून करण्यात आलेल्या खिचडी वितरणप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने शिवसेनेचे (ठाकरे) सूरज चव्हाण व अमोल कीर्तिकर यांच्यासह आठ आरोपींविरोधात शुक्रवारी आरोपपत्र दाखल केले. एस्प्लेनेड न्यायालयात शुक्रवारी आरोपपत्र दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. करोना काळात खिडची वितरण गैरव्यवहारातून आरोपींनी १४ कोटी ५७ लाख रुपये गैरमार्गाने कमवल्याचा आरोप आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे साहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाळ लावणे यांच्या तक्रारीवरून गेल्यावर्षी गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणी महापालिकेची सहा कोटी २७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप होता. त्याअंतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पण आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात फसवणुकीची रक्कम वाढली आहे. याप्रकरणी आता आर्थिक गुन्हे शाखेने आठ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. यापैकी सूरज चव्हाण ठाकरे गटाच्या युवासेनेचे पदाधिकारी आहेत. तर अमोल कीर्तिकर हे माजी खासदार गजानन कीर्तिकर यांचे पुत्र आहेत. त्यांनी शिवसेनेतर्फे (ठाकरे) खासदारकीची निवडणूकही लढवली होती. याशिवाय आरोपी संजय मशिलकर शिवसेनेशी (शिंदे) संबंधित आहेत. आरोपपत्रानुसार आरोपींनी एप्रिल २०२० ते जुलै २०२० या कालावधीत महानगरपालिकेच्या खिचडी वाटपाचे पात्रता निकषामध्ये बसत नसलेले, तसेच ३०० ग्रॅम खिचडीऐवजी केवळ १०० ते २०० ग्रॅम वजनाच्या खिचडी पाकिटांचे वितरण केले.


## महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधीचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये जप्त केलेल्या मालमत्तेच्या लिलाव विक्रीची जाहीर नोटीस

याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, मा. विशेष सत्र न्यायाधीश शहर दिवाणी व सत्र न्यायालय, न्यायालय क्र. २०, मुंबई यांच्या दि. २२.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये खालील नमूद मालमत्ता जशी आहे, जेथे आहे त्या स्थितीत वर नमूद केलेल्या पत्त्यावरील **उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, कुर्ला** यांच्यामार्फत खालील अटी व शर्तीवर लिलावाद्वारे विकण्यात येणार आहे. ज्या व्यक्तीस सदर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी सदर मालमत्तेसाठी स्वतंत्र अर्ज करावा. या अर्जामध्ये प्रत्येक मालमत्तेच्या न्यूनतम किमतीच्या (शासकीय मूल्यांकनकर्त्यांनी सादर केलेल्या मूल्यांकनाच्या रकमेच्या) १०% रकमेचा डी.डी./ पे-ऑर्डर (फक्त राष्ट्रीयीकृत बँकेकडील) बयाणा रक्कम सोबत जोडून लिलावात भाग घेऊ शकतील. डी.डी./ पे-ऑर्डर **उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, कुर्ला** टोपीवाला कॉलेज बिल्डिंग, तळमजला, एस. एन. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०००८० यांच्या कार्यालयात दि. १५.०५.२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावा. सदर मालमत्तेसंबंधी विस्तृत माहिती अर्जाचा नमुना व लिलावाच्या अटी व शर्तीबाबतची माहिती http://mumbaisuburban.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्याचे अधिकार मा. विशेष न्यायालयास राहतील.

माहितीसाठी खालील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा.

श्रीम. अनघा करमरकर, सहायक महसूल अधिकारी, मो. नं.- ८५९१४३७४८२

पात्र अर्जदारांना लिलावाची तारीख स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

| अधिसूचना अ. क्र. | मिळकतीचा तपशील | मालमत्तेची वर्गवारी | क्षेत्रफळ | शासकीय मान्यताप्राप्त मूल्यांकनानुसार मूल्य रु. | १०% बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| २. | गाळा क्र. ३०३, ॲटलान्टिक कमर्शियल टॉवर, आर. बी. मेहता मार्ग, घाटकोपर पूर्व, मुंबई. | वाणिज्य | १९.४० चौ.मी. | ३७,८८,४३२/- | ३,७८,८४३/- |

स्वाक्षरी/-
**(योगेश खरमाटे)**
**उपजिल्हाधिकारी (अति/निष्का)**
**कुर्ला**

डीजीआयपीआर/२०२५-२६/६०१



**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:**
बृंदावन, प्लॉट नं. १७७, कलिना,
सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ,
सांताक्रूझ (पू), मुंबई ४०० ०९८
**CIN No.:** L67120MH2008PLC181833

T +९१ २२ ६२१२ ५०००
F +९१ २२ ६२१२ ५५५३
E igrc@ltfs.com
www.ltfinance.com

L&T Finance

## सूचना

ह्याद्वारे **सूचना** दिली जात आहे की कंपनीची **सतरावी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') मंगळवार, ३ जून २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून [व्हिडिओ कॉन्फरंस (''व्हीसी'') किंवा इतर ऑडिओ-विजूअल माध्यमातून (''ओएव्हीएम'')]** एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये (''सूचना'') नेमून दिलेले कामकाज पार पाडण्यासाठी भरवण्यात येईल. कॉर्पोरेट मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकांनुसार (''एमसीए परिपत्रके'') ही एजीएम व्हीसी/ओएव्हीएमद्वारे भरवण्यात येईल.

एमसीए परिपत्रकांचे पालन करून, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') द्वारे जारी केलेले परिपत्रक, कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स') च्या संबंधित तरतुदींनुसार, आर्थिक वर्ष २०२५ साठी एकात्मिक वार्षिक अहवाल ('अहवाल') सह वार्षिक सामान्य सभा बोलावण्याची सूचना ९ मे २०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांना पाठवण्यात आली आहे ज्यांचे ई-मेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट ('डीपी')/कंपनी/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट्स उदा. एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (आधीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) ('आरटीए') यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. सदस्य कंपनीला igrc@ltfs.com वर ई-मेल पाठवून अहवालाच्या भौतिक प्रतीची विनंती करू शकतात.

हा अहवाल कंपनीच्या https://www.ltfinance.com/investors या वेबसाइटवर, स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वरही उपलब्ध आहे. याव्यतिरिक्त, हा अहवाल सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') च्या वेबसाइटवर www.evotingindia.com वरही उपलब्ध आहे. कायद्याअंतर्गत विनंती केलेल्या सूचनेत उल्लेख केलेले/सर्व कागदपत्रे सूचना पाठवल्याच्या तारखेपासून मंगळवार, ३ जून २०२५ पर्यंत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तपासणीसाठी उपलब्ध आहेत. अशा कागदपत्रांची तपासणी करू इच्छिणाऱ्या सदस्यांना कंपनीला igrc@ltfs.com वर लिहिण्याची विनंती आहे.

लाभांश प्राप्त करण्यासाठी पात्र असलेल्या सदस्यांची यादी विचारात घेण्यासाठी नोंदीची तारीख, जर सदस्यांनी मान्य केली तर, मंगळवार, २७ मे २०२५ आहे.

सदस्यांना एजीएममध्ये, एजीएम सुरू होण्याच्या १५ मिनिटे आधी व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सहभागी होता येईल आणि एजीएम दरम्यान सीडीएसएलने www.evotingindia.com वर पुरवलेल्या सुविधेद्वारे लॉगिन क्रेडेंशियल्स आणि कंपनीच्या एजीएमसाठी इलेक्ट्रॉनिक वोटिंग सिक्वेन्स नंबर निवडून (ईव्हीएसएन) उपस्थित राहाता येईल. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभागी होण्याची प्रक्रिया सूचनेमध्ये दिली आहे.

कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत सभासदांची गणपूर्ती निश्चित करण्यासाठी व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभागी झालेल्या सदस्यांची गणना करण्यात येईल.

**दूरस्थ ई-मतदान आणि एजीएम दरम्यान ई-मतदानासाठी सूचना:**

कायद्याच्या कलम १०८, कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २०, सर्वसाधारण सभेवरील सचिवीय मानक आणि सेबी लिस्टिंग रेग्युलेशनच्या नियम ४४ च्या तरतुदींचे पालन करून, वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी (''रिमोट ई-व्होटिंग'') मतदान करण्याची सुविधा कंपनी सीडीएसएल द्वारे प्रदान करत आहे. रिमोट ई-व्होटिंग सुलभ करण्यासाठी कंपनीने सीडीएसएलसोबत आवश्यक व्यवस्था केल्या आहेत. सर्व सदस्यांना येथे कळविण्यात येते की:

- ज्या व्यक्तीचे नाव, सदस्य नोंद वही/डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या सदस्यांच्या लाभार्थी मालकांच्या यादीत कट-ऑफ तारखेला म्हणजेच मंगळवार, २७ मे २०२५ रोजी नोंदवले आहे, त्यांनाच एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग किंवा ई-व्होटिंगची सुविधा मिळू शकेल.

दूरस्थ ई-मतदान खालील कालावधी दरम्यान उपलब्ध राहील:

| | |
|---|---|
| दूरस्थ ई-मतदानाची सुरुवात | **शनिवार, ३१ मे २०२५ रोजी सकाळी ०९.३० पासून (भारतीय प्रमाणवेळ)** |
| दूरस्थ ई-मतदानाची समाप्ती | **सोमवार, २ जून २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत (भारतीय प्रमाणवेळ)** |

- सोमवार, २ जून २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता दूरस्थ ई-मतदान खंडित करण्यात येईल आणि ते फक्त एजीएम दरम्यान सुरु राहील.
- एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले सदस्य व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात/भाग घेऊ शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.
- जे सदस्य, व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये उपस्थित आहेत आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे ठरावांवर आपले मत दिले नसेल तर ते एजीएम दरम्यान ई मतदानाद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.
- सूचना पाठवल्यानंतर ज्या व्यक्तींनी कंपनीचे समभाग घेतले आहेत आणि जे कंपनीचे सदस्य बनले आहेत, त्यांना सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळू शकतो.
- इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे वार्षिक अहवाल प्राप्त करण्याच्या मर्यादित हेतूसाठी, डीपीज/कंपनी/आरटीएकडे ई-मेल पत्ता नोंदणीकृत नसल्यास, सदस्य कंपनीला igrc@ltfs.com वर ई-मेल पाठवून ई-मेल आयडी नोंदणी करू शकतात. ज्या सदस्यांनी अजूनही ई-मेल पत्ते नोंदवलेले नाहीत त्यांना विनंती आहे की ज्यांच्याकडे अभौतिक स्वरूपात समभाग असतील तर डीपीजकडे नोंद करावी आणि भौतिक स्वरूपात समभाग असतील तर कंपनी/आरटीएकडे नोंदणी करावी.
- सर्व सदस्यांना दूरस्थ ई-मतदान किंवा एजीएममध्ये ई-मतदान करण्यासाठी (भौतिक स्वरूपात समभाग असलेले सदस्य/ज्यांचे ई-मेल पत्ते डीपीज/कंपनी/ आरटीएकडे नोंदवलेले नाहीत त्यांसह) तपशीलवार प्रक्रिया आणि माहिती सूचनेमध्ये दिली आहे.
- एजीएमच्या आधी किंवा एजीएम चालू असताना कोणालाही ई-मतदानाबद्दल तांत्रिक मदत हवी असेल तर सदस्यांनी ह्यांना संपर्क करावा:

श्री. राकेश दळवी, वरीष्ठ व्यवस्थापक
सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड,
ए विंग, २५ मजला, मॅरॅथॉन फ्युचरेक्स,
मफतलाल मिल कंपाउंड, एन एम जोशी मार्ग,
लोअर परळ (पूर्व), मुंबई-४०००१३
ई-मेल: helpdesk.evoting@cdslindia.com
संपर्काचा तपशील: १८०० २१ ०९९११

**एल&टी फायनान्स लिमिटेडसाठी**
(आधीचे नाव एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)

**अपूर्वा राठोड**
**कंपनी सचिव**
**एसीएस १८३१४**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ९ मे २०२५